

# श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

१३६० शुक्रवार पेठ, भारत भवन ब, बाजीराव रस्ता, पुणे - ४११००२.
दूरध्वनी 9307 65 45 89 / 020-24433939
ईमेल shivcharitraspardha@gmail.com

## शिवचरित्र स्पर्धा

**राज्याभिषेक शक ३५१** **शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५**

**सप्रेम नमस्कार,**

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाची स्थापना लोकमान्य टिळकांच्या पुढाकाराने १८९५ साली झाली. तेव्हापासून मंडळ किल्ले रायगडावर शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम आयोजित करीत आहे. मंडळाच्याच प्रयत्नाने किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार १९२६ साली करण्यात आला. शिवचरित्र, हिंदवी स्वराज्य आणि साम्राज्याच्या इतिहासाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी मंडळ सातत्याने प्रयत्न करीत आहे.

साडेतीनशे वर्षांपूर्वी शिवरायांनी अन्यायी, अत्याचारी, धर्मांध सत्तांशी संघर्ष करून एक आदर्श, लोककल्याणकारी स्वराज्य निर्माण केले. शेकडो वर्षांच्या सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून समाज आणि राष्ट्राला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. शिवरायांनी स्वतःच्या त्यागमय जीवनाचा आदर्श सर्वांसमोर ठेवून समाजाला आदर्शाकडे नेले. त्यांनी भयमुक्त, भ्रष्टाचारमुक्त आणि दहशतमुक्त समाज निर्माण केला. शिवरायांच्या पश्चात दिल्लीपती मुघल बादशहा औरंगजेब लाखोंचे सैन्य घेऊन छोटेसे स्वराज्य जिंकण्यासाठी महाराष्ट्रात आला. त्यावेळी छत्रपती संभाजीमहाराज, छत्रपती राजाराममहाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली २७ वर्षे मराठ्यांनी संघर्ष करून हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. हा मराठ्यांच्या स्वातंत्र्यलढ्याचा देदीप्यमान इतिहास शिवरायांच्या इतिहासासारखाच आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहे.

औरंगजेबाच्या निधनानंतर मराठ्यांनी हिंदवी स्वराज्याचा अटकपासून कटकपर्यंत विस्तार करून शिवरायांचे स्वप्न साकार केले. या प्रेरणादायी इतिहासाचा प्रसार व प्रचार करून आम्हांला उद्याचा आदर्श आणि गौरवशाली हिंदुस्थान निर्माण करता येईल. याच ध्येयाने श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी देशव्यापी शिवचरित्र स्पर्धेचे आयोजन करीत आहे. या स्पर्धेसाठी आवश्यक असणारे शिवचरित्र, हिंदवी स्वराज्य आणि साम्राज्याचा समग्र इतिहास ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञांकडून लिहून घेऊन ते ग्रंथ मंडळाने प्रसिद्ध केले आहेत.

या स्पर्धेसाठी मंडळाने मराठी, हिंदी आणि इंग्रजी माध्यमातून तीन ग्रंथांची निर्मिती केली आहे. त्यामधून आपल्या देदीप्यमान इतिहासाचे आकलन होईल. हे तीनही ग्रंथ प्रत्येक भारतीयाच्या संग्रही असावेत असे आहेत. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी सर्व शिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालये आणि पालकांनी या उपक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यावी ही विनंती.

आपला विनित,
**रघुजीराजे शहाजीराजे आंग्रे**
अध्यक्ष, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे

---

### स्पर्धेचा अभ्यासक्रम

**इयत्ता सातवी, अकरावी, बारावी आणि डिप्लोमा (तीन वर्षे)**

युवा इतिहास संशोधक डॉ. केदार फाळके यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. गजानन मेहेंदळे आणि श्री. पांडुरंग बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांकरिता **'छत्रपती शिवाजीमहाराज'** / **'Chhatrapati Shivaji'** या ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता दिला जाईल. त्यावर ही स्पर्धा आयोजित केली जाईल.

**इयत्ता आठवी आणि पदवी अभ्यासक्रम**

ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे, इतिहास अभ्यासक श्री. सुधीर थोरात आणि इतिहास तज्ज्ञ श्री. मोहन शेटे यांनी **'स्वराज्यरक्षणाचा लढा'** / **'The Fight For Defending The Swaraj'** या ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता दिला जाईल. त्यावर ही स्पर्धा आयोजित केली जाईल.

**इयत्ता नववी, दहावी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम**

ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे आणि इतिहास अभ्यासक श्री. सुधीर थोरात यांनी **'अठराव्या शतकातील हिंदवी साम्राज्य'** / **'Maratha Empire (Hindavi Samrajya) During the 18th Century'** या ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता दिला जाईल. त्यावर ही स्पर्धा आयोजित केली जाईल.

## स्पर्धेचे स्वरुप

१) **स्पर्धेचे शुल्क :** 'छत्रपती शिवाजीमहाराज' / 'Chhatrapati Shivaji' आणि 'स्वराज्यरक्षणाचा लढा' / 'The Fight For Defending The Swaraj' या दोन ग्रंथावर आधारित गटांना शुल्क **रु. २००/-** आणि 'अठराव्या शतकातील हिंदवी साम्राज्य' / 'Maratha Empire (Hindavi Samrajya) During the 18th Century' या ग्रंथावर आधारित गटाला शुल्क **रु. २५०/-** इतके असेल. सदर शुल्कामध्येच आपापल्या गटाप्रमाणे आवश्यक ग्रंथ विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

२) स्पर्धा लिखित स्वरुपाची असेल. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतंत्र उत्तरपत्रिकेवर गोल रंगवून द्यावयाची आहेत.

३) स्पर्धा मराठी आणि इंग्रजी माध्यमात होईल. प्रत्येक गटानुसार वेगवेगळ्या ग्रंथांवर घेण्यात येईल.

४) प्रश्नपत्रिका १०० गुणांची असेल. प्रश्नपत्रिकेत ५० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नाच्या योग्य उत्तरास २ गुण दिले जातील. प्रश्न सोडविताना विद्यार्थ्यांनी निळ्या किंवा काळ्या बॉलपेनचा वापर करावा.

५) परीक्षा केंद्र स्तरावर होईल. किमान १०० विद्यार्थी ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी केंद्र बनविले जाईल

६) आदर्श उत्तरपत्रिका स्पर्धेनंतर सुमारे एक आठवड्यानंतर श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या www.shivajiraigad.com या website वर दिली जाईल तसेच स्पर्धेचा निकालही साधारणपणे दि. १५ मार्च २०२५च्या सुमारास वेबसाईटवर जाहीर केला जाईल. उत्तरपत्रिकेची दुसऱ्यांदा पडताळणी केली जाणार नाही.

७) किमान ३ केंद्रे असलेल्या तालुक्यात प्रथम येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना किल्ले रायगडावरती दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीसाठी बोलविले जाईल. दुसरी फेरी लेखी स्वरुपात होईल. ही स्पर्धा प्रसंग वर्णनात्मक असेल. या स्पर्धेतून निवडलेल्या विद्यार्थ्यांची तिसरी फेरी मुलाखत किंवा वक्तृत्व स्पर्धा घेऊन आयोजित केली जाईल. त्यामधून महाराष्ट्रातील प्रथम ३ विजेते काढले जातील. रायगडावरील फेरीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना सविस्तर तपशील नंतर कळविला जाईल.

## पारितोषिक योजना

१) शालेय विद्यार्थ्यांमध्ये (इ. सातवी ते दहावी) तालुक्यात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ३०१ इतके पारितोषिक ऑनलाईन बँक खात्यात जमा केले जाईल. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये (अकरावी, बारावी, डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर) तालुक्यात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१ इतके पारितोषिक ऑनलाईन बँक खात्यात जमा केले जाईल. गटात किमान ४० विद्यार्थी असतील तरच त्या गटासाठी तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दिले जाईल. तसेच पुढील फेरीसाठी निवड करण्याचा अधिकार श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाकडे राहील.

२) राज्यात प्रत्येक वयोगटामध्ये प्रथम येणाऱ्या ३ विद्यार्थ्यास रु. ५००१/-, रु ३००१ /-, रु.१००१ /- इतक्या रुपयांची पारितोषिके ऑनलाईन बँक खात्यात जमा केली जातील.

३) तालुक्यातील पहिल्या क्रमांकाची निवड करीत असताना एका पेक्षा अधिक विद्यार्थ्यास समान गुण मिळाल्यास संगणकीय लकी ड्रॉ पद्धतीने त्यापैकी पहिल्या विद्यार्थ्याची निवड केली जाईल. त्याबाबतचा अंतिम निर्णय श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचा राहील.

४) स्पर्धेस उपस्थित राहाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रशस्तिपत्रक देण्यात येईल.

## स्पर्धेचे व निकालाचे वेळापत्रक

१) स्पर्धा शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० या वेळात होईल.

२) सकाळी १०.३० वाजता विद्यार्थ्यांनी स्पर्धा केंद्रावरती उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३) स्पर्धेचा निकाल दि. १५ मार्च २०२५ नंतर मंडळाच्या www.shivajiraigad.com या website वर जाहीर केला जाईल आणि दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी शाळेमध्ये प्रशिस्तपत्रके देण्यात येतील तसेच पारितोषिकांची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात ऑनलाईन जमा करण्यात येईल.

## स्पर्धेचे शुल्क, केंद्र आणि बैठक व्यवस्था यासंबंधी सूचना

१) शाळा किंवा महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी विहित मुदतीत सोबत दिलेल्या नमुन्यानुसार श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाकडे पाठवावी. शुल्क जमा करण्यासाठी खालील माहितीचा वापर करावा. शुल्क भरल्याचा तपशील shivcharitraspardha@gmail.com या ईमेलवर किंवा 9307654589 या नंबरवर कळवावा.

२) किमान १०० विद्यार्थी ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी केंद्र बनविले जाईल. केंद्राचा तपशील तसेच बैठक क्रमांक व बैठक व्यवस्था दि. १ फेब्रु २०२५ नंतर मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

३) **शुल्क पुढील खात्यात जमा करावे. Shri Shivaji Raigad Smarak Mandal**

Janata Sahakari Bank Ltd., Pune
Saving A/C No. 001220100001211
**UPI id : raigadsmarak@jsb**

Bajirao Road Branch,
IFSC : JSBP0000098
Mobile 9422016539

QR code
for payment

**४) विद्यार्थ्यांच्या नावांची यादी आणि शुल्क स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. १४ जानेवारी २०२५ अशी राहील.**